**प्रेसनोट**

पुणे, दिनांक- ०४ .०९.२०१९

जा.क्र.पो.उप.आ/वाहतुक/८०२८४/२०१९

**विषय :- पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी होणारे गणेश विसर्जन ठिकाणांजवळ करण्यात आलेली पार्कींग व्यवस्थे बाबत.**

पुणे शहरात दिनांक- ०२.०९.२०१९ ते १२.०९.२०१९ या कालावधीत मोठया प्रमाणात गणेशोत्सव साजरा होत आहे. सदर गणेशोत्सवाचे कालावधीत कित्येक भाविक त्यांचे धार्मिक परंपरेनुसार पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी गणेश विसर्जन करीत असतात.चालू वर्षी गणेश उत्सवात दिनांक ०६.०९.२०१९ रोजी **पाचवा** दिवस, दिनांक-०८.०९.२०१९ रोजी **सातवा** दिवस व दिनांक १०.०९.२०१९ रोजी **नववा** दिवस येत असून सदर दिवशी प्रामुख्याने खालील ठिकाणी गणेश विसर्जन करण्यात येते. सदर ठिकाणी गणेश विसर्जनाकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे पार्कींग व्यवस्थे बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

**१. अप्सरा टॉकीज जवळील कॅनॉल (पंडीत जवाहरलाल नेहरू रस्ता)**

❖ पार्किंग-पंडीत नेहरू रस्त्यावर वाहने अप्सरा टॉकीजचे बाजूस पार्क करावीत.

**२. चिमाजी आप्पा पेशवे पथावरील सावरकर पुतळयाजवळील कॅनॉल (मित्रमंडळ - सावरकर चौक दरम्यान),**

❖ पार्किंग- चिमाजी आप्पा पेशवे पथावर कॅनॉलचे पुढे मित्रमंडळ चौकापर्यंत पाटील प्लाझाचे डावे बाजूस तसेच सावरकर पुतळा चौकापासून ते पेशवे पार्क या सिंहगड रोडवर सारसबागेचे बाजूस पार्क करावीत.

**३. संगमपूल घाट (आर.टी.ओ. जवळ मोतीलाल रस्त्यावर)**

❖ पार्किंग- संगम पुल येथील राजाबहादुर मिल रोडवर सी.आय.डी. कार्यालय ते आर.टी.ओ. चौक येथे दोन्ही बाजूस भिंतीस लागून पार्क करावीत. तसेच एस.एस पी.एम.एस. ग्राऊंडचे बाजूसही वाहने पार्क करावीत.

**४. एस.एम.जोशी पुलाखाली (गरवारे कॉलेज मागे)**

❖ **पार्किंग** -एस.एम.जोशी पुलाजवळ गरवारे कॉलेजच्या मागील बाजूस व ठोसर बागे समोरील स्टेट बँक(वैकुंठ - स्मशानभूमी रोड)

**५. बाबा भिडे पुल : दोन्ही बाजुस (डेक्कन पीएमपीएमएल बसस्टॉप जवळ).**

❖ **पार्किंग**- बाबा भिडे पूल दोन्ही बाजूस नदी पात्रातील मोकळी जागा.(पूर परिस्थितीनुसार)

तरी गणेश विसर्जन पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी विसर्जनाचे वेळी सोबत आणण्यात येणारी वाहने श्रींची मुर्ती वाहनांवरून उतरून घेतल्यानंतर तात्काळ सदर ठिकाणाहून वाहन हालवुन ते वाहतूकीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी रस्ता सोडून अन्यत्र हलवावे.

गणेशोत्सवात वाहतुक कोंडीची समस्या टाळण्यासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करून पुणे शहर वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे हि विनंती.

04.09.19

**(पंकज देशमुख)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.